## KATARE SPINNING MILLS LIMITED

"KATARE COMPLEX" , 14/30, RAVIWAR PETH,
2nd WING, GROUND FLOOR, GANDHI NAGAR,
AKKALKOT ROAD, SOLAPUR- 413 005
MILL - "KAMALA NAGAR", TAMALWADI. Tal. TULJAPUR.
OFFICE : 0217-2376555
Email : katarespinningmills@gmail.com
CIN : L17119PN1980PLC022962


Ref. No. KSM- 29 /2023-24

18.08.2023

**To**
**Department of Corporate Services,**
**Bombay Stock Exchange Ltd,**
Floor No. 25 PhirozJeejeebhay Towers,
Dalal Street,
Mumbai- 400 001
**BSE Scrip Code: 502933**

**SUB: NEWSPAPER ADVERTISEMENT - FINANCIAL RESULTS**

Dear Sir/Madam,

Please find enclosed herewith the newspaper advertisement with regards to the Financial Results of the Company for the quarter ended June 30, 2023, published on Friday, August 18, 2023 in the following newspapers:

1. Business Standard (English)
2. Tarun Bharat, Solapur (Marathi)

This information is being submitted pursuant to Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.

Please take the aforesaid on your records and acknowledge the receipt.

Thanking you,
Yours faithfully,

**FOR KATARE SPINNING MILLS LIMITED**

KATARE SPINNING MILLS LTD.

**KISHORE KATARE**
**MANAGING DIRECTOR**
**(DIN- 00645013)**

# जलजीवनच्या टेबलचे लिपिक पाटील, समदुरले निलंबित

## सीईओ आव्हाळे यांचा दणका : तर ठेकेदारांना काळ्या यादीत टाकणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील जलजीवन मिशन योजनेच्या निविदा टेबलचे काम पाहणाऱ्या अनिल पाटील व शामसुंदर समदुरले या दोन लिपिकांना सीईओ मनीषा आव्हाळे यांनी कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी निलंबित केले आहे.

सीईओ मनीषा आव्हाळे यांनी पदभार घेतल्यानंतर जलजीवन मिशन योजनेच्या कामाला गती देण्यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे. यापूर्वी प्रभारी सीईओ म्हणून कामकाज पाहत असताना जलजीवन मिशन योजनेच्या कामात झालेला गोंधळ त्यांनी पाहिला होता. तत्कालीन सीईओ दिलीप स्वामी यांच्या कालावधीत जलजीवन योजनेच्या निविदेत मोठया प्रमाणावर गडबड झाल्याची तक्रार आमदार सुभाष देशमुख यांनी जिल्हा नियोजन समितीच्या सभेत केली होती. यावरून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी चौकशीचे आदेश दिले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक संतोष माळी यांच्या समितीने चौकशी करून निविदाप्रक्रियेतील अनियमितता उघड केली होती. यामुळे या योजनेच्या १७३ फायलींना ब्रेक लागला होता. या प्रक्रियेतील संबंधीत अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू झाली आहे.

यात ई निविदा प्रक्रियेत सहभागी असलेल्या पाटील व समदुरले यांच्यावरही ठपका ठेवण्यात आला होता असे सांगण्यात आले. यावरून सीईओ आव्हाळे यांनी या दोघांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे या दोघांवर सोमवारी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. सीईओ आव्हाळे यांना पदभार घेवून अजून महिना व्हायचा आहे. अशात त्यांनी कामात हयगय करणाऱ्यांना दणका दिल्याने कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. जलजीवन अंतर्गत सुरू असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या कामांची तपासणी करण्यात येत आहे. निकृष्ट कामे करणाऱ्यांना काळ्या यादीत टाकण्यात येणार असल्याचा इशारा सीईओ आव्हाळे यांनी दिला. तसेच ज्या गावात ज्या ठेकेदाराला काम मंजूर आहे अशांनी कामाची ठिकाणी माहितीचा फलक लावला नसल्यास बिल काढणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

### कंत्राटी असो किंवा..

निलंबित झालेले अनिल पाटील व शामसुंदर समदुरले या दोघांची मागील महिन्यात झालेल्या प्रशासकीय बदल्यांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभागातून बदली झाले आहे. पाटील माध्यमिक शिक्षण विभाग तर समदुरले बांधकाम विभाग दोनमध्ये कार्यरत आहेत. कंत्राटी किंवा कायम कर्मचारी असोत, कामात हयगय दिसून आल्यास कोणाचीही गय करणार नाही असा इशारा सीईओ आव्हाळे यांनी दिला आहे.

# सव्वालाख एचआयव्ही टेस्ट, ७२ पॉझिटिव्ह रुग्ण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

सोलापूर जिल्ह्यात १ लाख ३७ हजार ४८९ जणांची एआयव्ही टेस्ट करण्यात आले असून, यात ७२ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले आहेत. तर एचआयव्ही बाधित मुलांच्या पोषण आहारासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीत ८४ हजार ५०० टेस्टिंग करण्याचे उद्दिष्ट होते परंतु जिल्ह्यात १ लाख ३७ हजार ४८९ एच आय व्ही टेस्ट करण्यात आलेल्या असून त्यात पॉझिटिव्ह ७२ आढळल्याची माहिती त्यांनी दिली. जिल्हा एड्स प्रतिबंध नियंत्रण युनिट अंतर्गत जिल्ह्यात असलेल्या मुलांना उत्कृष्ट पोषण आहार उपलब्ध झाला पाहिजे. त्यासाठी आवश्यक असलेला १० लाखाचा निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येईल. तरी आरोग्य विभागाने त्यासाठी सविस्तर प्रस्ताव नियोजन समितीकडे पाठवावा. तसेच संपूर्ण जिल्ह्यात विशेषतः उत्तर सोलापूर, माळशिरस, पंढरपूर व बार्शी या तालुक्यात एड्स प्रतिबंधासाठी जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवावी. आयईसी वाहनाच्या दुरुस्तीसाठी निधी मागणी तसेच सबट्रॉन टॅबलेट मागणी प्रस्ताव त्वरित सादर करावा, असे त्यांनी सूचित केले. जिल्हा एड्स प्रतिबंध नियंत्रण मागील तीन महिन्यात केलेल्या कामकाजाची माहिती कार्यक्रम अधिकारी भगवान भुसारी यांनी बैठकीत सादर केली.

# काँग्रेस शहर काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी मुमताज शेख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**



माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, आमदार प्रणिती शिंदे यांच्या शिफारसीनुसार मुमताज मदार शेख यांची सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

त्यांना निवडीचे पत्र आ. शिंदे यांच्या हस्ते शहर अध्यक्ष चेतन नरोटे, यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस भवन येते देण्यात आले. यावेळी महिला अध्यक्षा प्रमिलाताई तुपलवंडे, माजी महापौर सुशिलाताई आबूटे, अलाकाताई राठोड, प्रवक्ते अशोक निंबर्गी, माजी नगरसेवक विनोद भोसले, प्रवीण निकाळजे बाबा करगुळे भीमाशंकर टेकाळे, तिरुपती परकीपंडला, संजय गायकवाड, दिनांनाथ शेळके हेमाताई चिंचोळकर करीमनिस्सा बागवान, शोभा बोबे सुमन जाधव, मीरा घटकांबळे, संघमित्रा चौधरी, मुमताज शेख रेखा बिनेक मीना गायकवाड आदि उपस्थित होते.

# ओम गर्जना गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी शुभम मंजरतकर

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**



ओम गर्जना युवाशक्ती सामाजिक व संस्कृत गणेशोत्सव मंडळ पदाधिकारी यांची बैठक रविवारी सायंकाळी सातच्या सुमारास सैफुल परिसरातील मारुती मंदिर येथे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारीची निवड करण्यात आले.

खालील प्रमाणे पदाधिकाऱ्यांची नावे: उस्तव अध्यक्ष : शुभम मंजरतकर. उपाध्यक्ष: जयंत खटके, आकाश गायकवाड, सचिव : गंगाधर कुलकर्णी, प्रमोद पुजारी, सहसचिव: विश्वनाथ करकंटी, दिलीप रोटे, खजिनदार: संतोष वाडेकर, व्यंकटेश शिंगरी, कार्याअध्यक्ष : बसवराज भरमगोंडे, कायदेशीर सल्लागार : प्रशांत नवगिरे ,विजय सुरवसे, सांस्कृतिक प्रमुख : राजेंद्र जमादार, अर्चना जमादार, राजू लोखंडे, सुनील मठपती, दत्तात्रय हडपद, सिराज नदाफ, सचिन करकंटी, पूजा समिती: अप्पू दुरणकर, सौरभ बागल, सल्लागार : वसंत धोत्रे , रेवणसिद्ध बिजरगी,नितीन शिवशरण, विजयकुमार निशानदार, भुताळसिदध कोरे आदींची निवड झाली.

# सोलापूर शहराच्या विकासासाठी मी कटिबद्ध : उपमुख्यमंत्री पवार

## किसन जाधव, नागेश गायकवाड यांचे उपमुख्यमंत्र्यांना साकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**



विकासगंगा आणून सोलापूर शहराचा कायापालट करावा यासाठी सोलापूर महानगरपालिकेतील राष्ट्रवादीचे माजी गटनेते किसन जाधव, माजी नगरसेवक नागेश गायकवाड आणि महाराष्ट्र युवक सरचिटणीस चेतन गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साकडे घातले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूर शहराच्या विकासासाठी मी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली आहे.

मुंबई येथील शासकीय निवासस्थानी भेट घेऊन जाधव यांनी शहराच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे साकडे घातले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, प्रदेश युवक अध्यक्ष सुरज चव्हाण यांचीही किसन जाधव, नागेश गायकवाड आणि चेतन गायकवाड यांनी भेट घेतली.

सोलापूर शहरातील विकास कामे, राष्ट्रवादी पक्ष संघटना मजबूत करण्याच्यासाठी आपला सोलापूर दौरा निश्चित करावा यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. येणाऱ्या महानगरपालिका निवडणूक, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागण्या संदर्भात सूचना करत अजित पवार यांनी सकारात्मक चर्चा केली. यावेळी किसन जाधव यांनी अजित पवारांना सोलापूर दौरा निश्चित करावी अशी मागणी केल्यानंतर अजित पवारांनी सकारात्मक दाखवली असून सोलापूर शहराच्या विकासासाठी मी कटिबद्ध असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची पक्ष संघटना देखील मजबूत होईल, अशी ग्वाही दिली. दरम्यान यावेळी किसन जाधव, नागेश गायकवाड आणि चेतन गायकवाड यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी सोलापूर शहर जिल्हा राष्ट्रवादी पक्षाचे कार्यालय व्हावे या दृष्टीने माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली असून लवकरच सोलापूर शहरात कार्यालय उभारेल असेही त्यांनी सांगितले. यावेळी उमेश जाधव, वीरेश सुतार, अजय नरवडे, महादेव राठोड, माऊली जरग, ऋषभ प्याटी आदींची उपस्थिती होती.


## कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : 14/30 तळमजला, बी विंग, कटारे कॉम्पलेक्स कॉम्प्लेक्स, गांधीनगर, सोलापूर MH- 413006.
CIN: L17119PN1980PLC022962
ईमेल: katarespinningmills@gmail.com

**३० जून २०२३ रोजी संपलेल्या तिमाही** अखेरकरिता अलेखापरिक्षीत स्थायी वित्तीय निष्कर्षाचा अहवाल
(रु. लाखात)

| अ.नं | विवरण | तिमाही समाप्त / 30 जून 2023 अलेखापरिक्षत | वर्ष ते तारिख आकडे/मागील वर्ष समाप्ती ३१ मार्च २०२३ लेखापरिक्षत | मागील वर्षात संबंधित 3 महिने संपले 30 जून 2022 अलेखापरिक्षत |
|---|---|---|---|---|
| 1. | एकूण उत्पन्न | 35.06 | 833.70 | 84.11 |
| 2. | कालावधीकरिता निव्वळ नफा(तोटा)(कर, अतिरिक्त व/या अतिविशेष बाबीपूर्व) | (20.74) | (134.25) | (29.19) |
| 3. | कर पश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा(तोटा)(कर, अतिरिक्त व/या अतिविशेष बाबीपश्चात) | (20.74) | (134.25) | (29.19) |
| 4. | कर पूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा(तोटा)(कर, अतिरिक्त व/या अतिविशेष बाबीपश्चात) | (20.74) | (151.19) | (29.19) |
| 5. | कालावधीकरिता एकुण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/तोटा समाविष्ट (कर पश्चात ) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात ) | (20.74) | (151.19) | (29.19) |
| 6. | इक्विटी भाग भांडवल (दर्शनी मुल्य रु. 10 प्रति शेअर ) | 28.5 | 28.5 | 28.5 |
| 7. | राखीव (मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे पुनर्मूल्यांकन राखीव वगळून |  | 616.39 |  |
| 8. | उत्पन्न प्रति शेअर 1. मुळ 2. सौम्य | (0.73) | (5.30) | (1.02) |

टीप:

अ) उपरोक्त हे **SEBI** (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, **2015** च्या नियमन **33** अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजमध्ये **30 जून 2023** रोजी संपलेल्या तिमाहीसाठीच्या आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा एक उतारा आहे. वित्तीयचे संपूर्ण स्वरूप **30 जून 2023** रोजी संपलेल्या तिमाहीचे निकाल स्टॉक एक्सचेंज s) **www.bseindia.com** च्या वेबसाइटवर आणि कंपनीच्या **www.katarespinningmillslimited.com** वर उपलब्ध आहेत.

ब) वरील आर्थिक परिणामांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि कंपनीच्या संचालक मंडळाने **14** ऑगस्ट **2023** रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.

कटारे स्पिनिंग मिल्स लिमिटेड साठी
SD/-
किशोर कटारे
व्यवस्थापकीय संचालक
(DIN- 00645013)

ठिकाण: सोलापूर
तारीख: 14.08.2023



## ग्रामपंचायत उंदरगाव, माढा, जि.सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत उंदरगाव, ता.माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोत्यात निविदा मागविण्यात येत आहे.
लेखाशिष

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग सन २०२३ मध्ये वाकाव रस्त्यावरील नळ्या टाणे व सिमेंट कॉंक्रीट करणे | १३६०००/- | १% | १००/- | ३ महिने | सु.वे.ध |
| २ | १५ वा वित्त आयोग सन २०२२-२३ मध्ये मागासर्गीय वस्तीमध्ये भूमिगत गटार करणे | १४४०००/- | १% | १००/- | ३ महिने | सु.वे.ध |

**टीप -**

१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी १८-०८-२०२३ सकाळी १०.०० पासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक २१/०८/२०२३ पर्यंत सकाळी १०.०० ते ६.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय उंदरगाव
३ निविदा उघडण्याचा दिनांक २२/०८/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता
४ निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रा.पं. उंदरगाव,**
**ता. माढा, जि. सोलापूर**

शिक्का

**सही/-**
**सरपंच**
**ग्रा.पं. उंदरगाव,**
**ता. माढा, जि. सोलापूर**


# रामचंद्र दळवे यांचे निधन

**करकंब, दि. १७ ऑगस्ट-**



कोष्टी गल्ली करकंब येथील रहिवासी रामचंद्र अनंत दळवे यांचे गुरुवार, दि. १७ ऑगस्ट रोजी संध्याकाळी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे.


## साने गुरुजी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

५/३५, शिवाजी नगर, मोदी रस्ता, सोलापूर ४१३००१ मो.९७६५८८८८६८

### जाहीर निविदा

आमच्या संस्थेच्या वतीन सभासदांना भेट वस्तु स्वरुपात BOSS ULTRA SANDWICH TOASTER B-516 (size 750w) द्यावयाची आहे.
तरी इच्छुक दुकानदारांनी सिलबंद निविदा दि.२५/०८/२०२३ च्या आत वरील पत्यावर आणुन द्यावेत.
टिप : १. सदरच्या वस्तु संस्थेच्या ठिकाणी पोहोच करणे.
२. निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार संस्थेकडे राखुन ठेवले आहेत.

सही
**श्री.सुनिलकुमार महादेव चव्हाण**
**चेअरमन**
साने गुरुजी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :

डिा सब डिा सोलापूर महानगरपालिका सोलापूर शहर हद्दवाढमधील ता. उत्तर सोलापूर पैकी मजरेवाडी हद्दीतील सर्व्हे नं. २३२ येथील थोबडे नगर मधील नं.प्लॅंट नं ८७२ व ८७१ पैकी उत्तरेकडील बाजूची यांचे हद्द पूर्वपश्चिम २५ व दक्षिणोत्तर २८ असे एकूण क्षेत्रफळ ७०० चौ फुट अथवा ६५.०५ ची मीटर इतकी जागा असून सदर जागेत (३) तीन खोल्या संपूर्ण विटा वाळू सिमेंटमध्ये बांधकाम केलेली असून वरती पन्हाळी पत्रे घातलेली आहे. त्यात संडास बाथरुइ बांधकाम केलेली आहे तसेच त्यात लाईट कलेक्शनसह आहे. बाकीची जागा खुली आहे असुन यासी चतु:सिमा पुर्वेस प्लॉट नं. ८७३, दक्षिणेस सदर प्लॉट पैकी राहिलेली जागा, पश्चिमेस रस्ता व उत्तरेस रस्ता.

वर नमुद वर्णणाची घरजागा ही श्री. विजय नरसय्या येमूल रा. ९३५, निलम नगर, मजरेवाडी, सोलापूर यांचे खरेदी मालकीची व कब्जेवहीवाटीची असून त्यांची सदरची जागा व त्यातील विटावाळूसिमेंट मधील बांधकामासह वगैरे तदंगभुत वस्तुसह आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून ती निर्वेध व निजोखीम व बिनबोजाची असल्याची हमी व खात्री देवून आमचे अशिलांकडून इसारा स्वीकारलेली आहे.

वर नमुद घरजागेबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा टाच जप्ती, दान गव्हाण, बोजा, बक्षीसपत्र, लिज, लिन, पोटगीहक्क, वालीवारस हक्क, मृत्यूपत्र कोर्ट केसेस, हितसंबंध, खरेदीखत, साठेखत, गहाणखत इत्यादी काही असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ (आठ) दिवसांच्या आत खालील पत्यावर लेखी कागदपत्रासह कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे आशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत आमच्या अशिलांवर व वरील घरजागेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली.
तारीख : १७/०८/२०२३

**अशिल-**
**सौ. सुप्रिया प्रशांत श्रीकोंडा**
रा. १४७१, दाजी पेठ,
सोलापूर

**सही/-**
**ॲड. दिपाली बा. मडूर**
**बी. ए. एलएलबी**
पद्माई निवास प्लॉट नं. ३३.
आदर्श नगर, सोलापूर
मो. नं. ९८२३४३०२२२



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः जि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे सुर्डी व इतर बाहेरगांवचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे सुर्डी येथील जमीन गट नंबर २६/१ब मध्ये एक समाईक विहीर आहे. सदरचे विहिरीमध्ये बळीराम वामन पवार, हनुमंत जालिंदर माळी व रंगनाथ दाजी माळी यांचे जमीन गट नंबर २६/१/ब मधील विहिरीमध्ये समाईक हिस्से आहेत. तसेच वरील तिघांची समाईक विहिरीवर कोटेशन व ३ एच.पी.ची समाईक मोटार आहे. वरील तिघांना समाईक विहिरीवर जाणेसाठी जमीन गट नंबर २६/१/ब चे पश्चिमेकडील व दक्षिण उत्तर बांधावर व २६/१ब च्या दक्षिणेकडील पूर्व पश्चिम बांधावरुन इलेक्ट्रीक मोटार चालू बंद करणेसाठी पाऊल रस्ता आहे. सुर्डीतील जमीन गट नंबर २६/१ब चे मालक देविदास मारुती माळी हे जमीन विक्री करणार असलेचे आमचे अशिलांना खात्रीलायक समजले आहे. तरी जमीन खरेदीदार याने सुर्डी येथील जमीन गट नंबर २६/१ब मध्ये समाईक विहिरीवर जाणे-येणेसाठी वरील प्रमाणे वहिवाट आहे याची माहिती घेवूनच जमीन खरेदीदार यांनी पाऊल रस्त्याची वहिवाट व समाईक विहीरपड क्षेत्र वगळून जमिनीचे खरेदीखत करावे. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

जाहीर नोटीस दिली. तारीख : १७/०८/२०२३
कळावे, ही जाहीर समन्स/नोटीस दिली. तारीख : ११/०८/२०२३

सही/-
**ॲडव्होकेट श्री. एस. के. शिंदे,**
रा. ८९८, कसबा पेठ, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
(बळीराम वामन पवार, हनुमंत जालिंदर माळी व रंगनाथ दाजी माळी,
रा. सुर्डी, ता. बार्शी तर्फे ॲडव्होकेट)



## जाहीर प्रसिद्धीकरण

**दि. कि. अर्ज नं. २५/२०२३ नि.नं.०७**
पुढील नेमलेली तारीख १२/०९/२०२३

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**श्रीमती सुनीती भ्र. विठ्ठल मोरे ऊर्फ विठ्ठलराव मोरे** ----- **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**विद्या पिता - अशोक पंके** ----- **सामेनवाला**

ज्याअर्थी मयत विठ्ठल ऊर्फ विठ्ठलराव एकनाथ मोरे हे दिनांक २८/०२/२०२३ रोजी बार्शी येथे मयत झालेले आहेत. त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार श्रीमती सुनीती भ्र. विठ्ठल मोरे ऊर्फ विठ्ठलराव मोरे व इतर १ यांनी या मे. कोर्टात ते सदरहू मयत विठ्ठल ऊर्फ विठ्ठलराव एकनाथ मोरे यांचे वारस असल्याने वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे.

त्याअर्थी एकटी अर्जदार नं. १ व २ सदरहू मयताचे वारसदार नाहीत असे कोणास सांगण्याचे असेल तर या जाहीर प्रसिद्धीकरणाच तारखेपासून १ महिन्याचे आत संबंधिताने या मे. कोर्टात हजर होवून आपल्या हरकती दिनांक १२/०९/२०२३ रोजी अगर वर नमूद मुदतीत कळवाव्यात.

सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दिलेस सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा घेवून त्यांना मयत विठ्ठल ऊर्फ विठ्ठलराव एकनाथ मोरे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देईल. हे जाहीर प्रगटीकरण दिले. तारीख : १४/०८/२०२३

सही/-
**वरिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

हुकूमावरुन
सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर प्रगटीकरण

**दि. कि. अर्ज नं. ६४/२०२३ नि.नं. ०६**
पुढील नेमलेली तारीख ३१/०८/२०२३

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**

१) **संतोष माधवराव नाईक,** वय ४३ वर्षे, धंदा- व्यापार, रा. येडाई विहीर, सुभाषनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **मंजुषा गणेश राजोपाध्ये,** वय ४७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. भैरुनाथ गल्ली, रांझणी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर
३) **अंजली विकास जोशी,** वय ४० वर्षे, धंदा- घरकाम, रा. फ्लॅट नं. ई ५,गट नं. १६२, अलोकनगर, बीड बायपास रोड, संभाजीनगर, जि. संभाजीनगर
४) **अमृता विरेंद्र कुलकर्णी,** वय ३८ वर्षे, धंदा- घरकाम, रा. घर नं. ११०, रामवाडी, उर्दू डी.एड. कॉलेज शेजारी, सोलापूर, ता. जि. सोलापूर
— **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सा. वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदाराचे वडील माधव श्रीनिवास नाईक हे दिनांक २३/०४/२०२१ रोजी बार्शी येथे मयत झालेले आहेत. त्यांचे जवळचे व कायदेशीर वारसदार म्हणून अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरहू मयत माधव श्रीनिवास नाईक यांचे पश्चात वारस प्रमाणपत्र मिळावे यासाठी अर्ज केला आहे.

त्याअर्थी अर्जदार हे सदरहू मयताचे वारसदार नाहीत असे कोणास सांगण्याचे असेल तर संबंधितांनी या जाहीर प्रगटीकरणाच्या तारखेपासून १ महिन्याचे आत या मे. कोर्टात हजर होवून आपल्या लेखी हरकती पुराव्या दाखल कागदपत्र दि. ३१/०८/२०२३ रोजी अगर वर नमूद मुदतीत सादर कराव्यात.

सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दिलेस सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा घेवून त्यांना मयत माधव श्रीनिवास नाईक यांचे पश्चात कायदेशीर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. हे जाहीर प्रगटीकरण दिले. तारीख : १८/०७/२०२३

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

हुकूमावरुन
सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर प्रसिद्धीकरण

**क्रि. कि. अर्ज नं. ४१५/२०२३**
पुढील नेमलेली तारीख १५/०९/२०२३

**बार्शी येथील मे. ज्युडि. मॅजिस्ट्रेट वर्ग-१ साहेब यांचे कोर्टात**

**ओंकार संभाजी जाधव,** वय २२ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. कळंबवाडी (पा.), ता. बार्शी, जि. सोलापूर — अर्जदार

**- विरुद्ध -**

**मा. ग्रामसेवक सो., ग्रामपंचायत कळंबवाडी (पा.),** ता. बार्शी, जि. सोलापूर (नोटीस यांचेवर बजवावे.) — सा. वाला

**अर्ज- जन्माची नोंद होवून मिळणेबाबत**

ज्याअर्थी, यातील अर्जदार **ओंकार संभाजी जाधव** यांनी त्यांचे जन्माचे नोंदीसाठी मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे व सदर सा.वाला ग्रामपंचायत कळंबवाडी (पा.) यांचे जन्म मृत्यू रजिस्टरला जन्माची नोंद होणेकामी मे. कोर्टाचे आदेश व्हावेत असा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सदरील जन्माचा दाखला यातील अर्जदार यांना देणेबाबत कोणाचे काही हरकत असेल व तसे समजवण्याचे असल्यास या जाहीर प्रसिद्धीकरणाचे १ महिन्याच्या आत अथवा नेमलेली तारीख १५/०९/२०२३ चे आत या मे. कोर्टात हजर होऊन लेखी व पुराव्यानिशी आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर मे. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन संबंधित सा.वाला यांचेकडे जन्माची नोंद करणेबाबत आदेश करेल.

हे जाहीर प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले.
तारीख : १७/०८/२०२३

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
फौजदारी न्यायालय, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर प्रसिद्धीकरण

**क्रि. कि. अर्ज नं. ३९६/२०२३**
पुढील नेमलेली तारीख ०७/०९/२०२३

**बार्शी येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**

**गोरी शहाबुद्दीन चाबरु (मोमीन),** वय ५६ वर्षे, धंदा- घरकाम, रा. कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर ह.मु. लक्ष्मीनगर, ज्वाला मित्रमंडळजवळ, येरवडा, पुणे — अर्जदार

**- विरुद्ध -**

**बार्शी नगरपरिषद, बार्शी,** ता. बार्शी, जि. सोलापूर — सा. वाला

ज्याअर्थी, अर्जदार ही बार्शी येथील मूळची रहिवासी असून हल्ली त्यांचे कुटुंब व्यवसायाकरीता पुणे येथे स्थाईक झालेले आहेत. अर्जदार ही बार्शी येथे राहत असताना तारीख ०२/०४/१९८६ रोजी राहते घरी बाळांत होवून तिला मुलगा झाला. सदर मुलाचे नांव महेमूद असे ठेवण्यात आले. अर्जदाराचे मुलाचे जन्माची नोंद अर्जदाराचे आई, वडील व नातेवाईक यांनी सा.वाला बार्शी नगरपालिका यांचेकडे करावी. परंतु अर्जदाराचे कुटुंबात कोणीही जाणकार इसम नसलेने व नजरचुकीने अर्जदाराचे मुलगा महेमूद शहाबुद्दीन चाबरु याचे जन्माची नोंद सा.वालाचे जन्म मृत्यूचे रजिस्टरला केली गेली नाही. परंतु हल्ली सदर अर्जदारास त्याचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता जन्म दाखल्याची गरज असलेने अर्जदाराने सा.वाला नगरपरिषदेकडे जन्माच्या दाखल्याची मागणी केली असता त्यांनी त्यांचेकडील रेकॉर्डचा शोध घेतला असता अर्जदाराचे मुलगा महेमूद याचे जन्माची नोंद करण्यात आलेली नाही म्हणून तसे पत्र दिले. अर्जदाराचे सदर मुलाचा जन्म बार्शी येथेच वर नमूद तारखेस झाला असलेने त्याचे जन्माची नोंद सा.वाला नगरपरिषदेचे जन्म मृत्यू रजिस्टरला करणेबाबत त्यांना मे. कोर्टाचे जरुर ते आदेश व्हावेत असे कथन करुन अर्जदारानी हल्लीचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे काही आक्षेप असलेस संबंधितानी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमले तारीख ०७/०९/२०२३ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख : १६/०८/२०२३

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
फौजदारी न्यायालय, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर